# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

जा.क्र.269./शि.वि./२०१५ दि.26/०६/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व मनपा प्राथ./माध्य. शाळा,
नागपूर.

**विषय :—संगणक प्रकल्पातील संस्थांचे संगणक परत घेवून जावू देण्याच्या परवानगी बाबत.**

उपरोक्त विषयान्वये सूचित करण्यात येते की, नागपूर महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक सत्र २००९–१० पासून मे.कम्प्युटर बिझनेस मॅनेजमेंट प्रा.लि. व मे. एव्हरॉन एज्युकेशन लि. या संगणक संस्थांच्या माध्यमातुन BOO तत्वावर संस्थांचे संगणक व तत्सम फर्निचर (प्रिंटर्स, टेबल, चेअर्स, इन्व्हर्टर, पंखे, बॅटरी) शाळेमधील वर्गखोलीत लावून संगणक शिक्षण देण्यात येत होते. प्रस्तुत प्रकल्प पांच वर्षाच्या मुदतीकरीता होता व यास पुनच्छ शैक्षणिक सत्र २०१४–१५ मध्ये मुदतवाढ देण्यात आली, परंतु विभागाचे पत्र क्रमांक 205/E.O., दिनांक 10/04/15 अन्वये दिनांक १५ एप्रिल, २०१५ पासून संगणक प्रकल्प बंद करण्यात आला. विभागाच्या सूचनेवरुन प्रस्तुत दोन्ही संस्थांचे संगणक व तत्सम फर्निचर संगणक प्रयोग शाळेत नुतन शैक्षणिक सत्र २०१५–१६ सुरु होईपर्यंत ठेवण्यात आले होते. सद्यस्थितीत संगणक संस्थांनी त्यांना त्यांचे इतर प्रकल्पात संगणक व इतर साहित्याची आवश्यकता असल्यामुळे त्यांचे सदर साहित्य परत घेण्याबाबत त्यांनी सूचित केले आहे.

या अनुषंगाने सुचित करण्यात येते की, प्रत्येक संगणक प्रयोगशाळेत एक संपूर्ण चालु स्थितीतील संगणक संच (Stand alone computer) ठेवून इतर साहित्य घेवून जाण्याची तसेच उर्वरीत एक संगणक संच दि. ७ जुलै, २०१५ नंतर घेवून जाण्याची परवानगी संगणक संस्थांना परवानगी देण्यात येत आहे.

सबब म.न.पा. शाळेत प्रस्तुत संगणक संस्थांचे प्रतिनिधी साहित्य घेण्यास आल्यास त्यांना योग्य ते सहकार्य करुन व परत घेवून जात असलेल्या साहित्याची नोंद आपले साहित्य नोंद पुस्तिकेत घेवून साहित्य सुपुर्द करावे.

**(मा.उपायुक्त, म.न.पा. यांचे दि.२६.०६.२०१५ चे मंजुरी अन्वये)**

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :—**

१. मा.उपायुक्त, म.न.पा., नागपूर
२. सर्व सहा.आयुक्त, झोन क्र.१ ते १०, मनपा, नागपूर
३. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.१ ते १०, मनपा, नागपूर
४. प्रोजेक्ट मॅनेजर, मे.कम्प्युटर बिझनेस मॅनेजमेंट प्रा.लि.
५. प्रोजेक्ट मॅनेजर, मे. एव्हरॉन एज्युकेशन लि.
६. श्री.विनय बगले, आय.टी. इंचार्ज, शिक्षण विभाग, मनपा, नागपूर

PC:3/C:/SRW/letter.doc